
दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०६ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.०५ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.
Scan QR code to visit... Epaper Portal

# सत्तेसाठी स्वाभिमान गहाण टाकणे माझ्याने शक्य नाही:शिवसेनेचे नेतृत्व करावे

## पक्षप्रमुख व्हावे असे कधीच मनात आले नाही – राज ठाकरे

मुंबई (वृत्तसंस्था)–लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवाराने धनुष्यबाणाच्या चिन्हावर लढावे, असा प्रस्ताव माझ्यासमोर ठेवण्यात आला तेव्हा मी हसलो. मी तो प्रस्ताव नाकारला, कारण सत्तेसाठी स्वाभिमान गहाण टाकणे माझ्याने शक्य नाही, असे वक्तव्य मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केले. बोल भिडू या वेब पोर्टलला दिलेल्या मुलाखतीमध्ये राज ठाकरे यांनी या मुद्द्यावर भाष्य केले आहे.दरम्यान राज ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, शिवसेना हा बाळासाहेब ठाकरे यांचा पक्ष आहे. त्या पक्षाचे नेतृत्त्व करायचे, हा विचार माझ्या मनाला कधीच शिवला नाही. मी एकविरा देवी किंवा अन्य कोणत्याही गोष्टीवर हात ठेवून ही शपथ घ्यायला तयार आहे. मी शिवसेनेचा पक्षप्रमुख व्हावे ही गोष्ट कधीच माझ्या मनात आली नाही. माझी एवढीच मागणी होती की, मला पक्षातील माझी जबाबदारी सांगा. नाहीतर मला फक्त निवडणुकीपुरता बाहेर काढायचे आणि नंतर बसवून ठेवायचे, हे मला मान्य नव्हते,राज्यात आधीच ट्रिपल इंजिन सरकार असतानाही त्यांना मनसेच्या चौथ्या इंजिनाची गरज का भासली? यावर राज ठाकरे यांनी त्यांच्या शैलीत उत्तर दिले.



राज ठाकरे म्हणाले, त्यांना माझ्याकडून इंजिन नव्हे, तर कोळसा हवा असेल. तर पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले की, मी आत्ता केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना समर्थन दिले आहे. हा विषय लोकसभेच्या दृष्टीने मोदींना पाठिंबा देण्याचा आहे. मी मोदींवर आणि भाजपवर प्रचंड टीका देखील केली आहे आणि त्याची कारणे देखील मी भर सभेत सांगितली आहेत. गुढीपाडव्याच्या सभेतही मी त्याचा पुनरुच्चार केला होता. मी ज्या प्रकारे लोकांसमोर माझी मते मांडली तशी मते इतर कुठल्याही पक्षांनी कधी मांडली नाहीत.राज ठाकरे म्हणाले की, आज जे लोक मोदींचा किंवा भाजपाचा विरोध करत आहेत त्यांच्यापैकी कुठल्या नेत्याने किंवा पक्षाने माझ्यासारख्या भूमिका घेतल्या नाहीत. हे जे लोक (महाविकास आघाडी) आज मोदींविरोधात बोलतात ते केवळ थातुर-मातुर बोलतात, माझ्यासारख्या ठाम भूमिका कोणी मांडल्या नाहीत. त्यांना काही मिळालं नाही म्हणून विरोध करतात. यांना (उद्धव ठाकरे) जर २०१९ मध्ये मुख्यमंत्रीपद दिले असते तर आज या लोकांनी भाजपचा आणि मोदींचा विरोध केला असता का? यांना सत्ता मिळाली नाही म्हणून हे सगळं चाललं आहे.राज ठाकरे म्हणाले की, मी शिवसेनेत असताना कोणत्याही पदाच्या लालसेने नव्हे तर केवळ माझ्या काकाला मदत करावी,याच भावनेने काम केले. मी पक्ष सोडला तेव्हा शिवसेनेचे ३२ आमदार आणि ७ खासदार माझ्याकडे आले होते. मला पक्ष फोडायचा असता तर मी तेव्हाच शिवसेना फोडली असती. पण मला दगाफटका करायचा नव्हता. मी बाळासाहेब ठाकरे यांना सांगून शिवसेनेतून बाहेर पडलो होतो, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

## वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू



**चंद्रपूर**–ताडोबाच्या बफरमधील शिवनी वनपरिक्षेत्रात तेंदुपत्ता संकलन करणे जिवावर बेतले असून वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू झाल्याची घटना ४ मे ला शनिवारी सकाळी उघडकीस आली.

कुकडहेटी उपवनपरीक्षेत्राच्या पेटगाव नियत क्षेत्रातील कक्ष क्रमांक ३२२ मध्ये बामणीमाल येथे तेंदूपत्ता संकलन करण्यासाठी दीपा दिलीप गेडाम (३३) वर्षीय महिला गेली होती. त्यावेळी वाघाने अचानक हल्ला करून ठार केल्याची घटना घडली. सदर घटनेची माहिती वनविभागाला मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने गावातील लोकांना घेऊन घटनास्थळी जात घटनेची चौकशी करत पंचनामा केला. मृतदेह हा शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. वाघाने महिलेचा बळी घेतल्याने परिसरात दहशद निर्माण झाली आहे. वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे. मृतकाचे नातेवाईकांना तातडीची मदत देण्यात आली आहे.

## श्री महाकाली क्रिडा महोत्सवात घडलेल्या पै.हितेश सोनवणे या कुस्ती पटुने पटकविले राज्य स्तरीय सुवर्ण पदक

### आमदार किशोर जोरगेवार यांनी केला सत्कार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पेतून दरवर्षी चंद्रपूरात आयोजित होत असलेल्या श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवातून घडलेल्या चंद्रपूरातील पै. हितेश सोनवणे या कुस्तीपटुने नाशिक येथे पार पडलेल्या वरिष्ठ ग्रीको रोमन राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत ६० किलो वजन गटात सुवर्णपदक पटकाविले आहे. त्याचा आज शनिवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी कार्यालयात सत्कार केला आहे.

चंद्रपूरातील खेळांडूना प्रोत्साहण देण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने श्री माता महाकाली महोत्सवाचे आयोजन केल्या जात आहे. या क्रिडा महोत्सवा अंतर्गत, कबड्डी, कुस्ती, यासह विविध खेळांचे आयोजन केल्या जाते. दरम्यान चंद्रपूरातील कुस्तीपटुंना मोठे व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी यंदा त्यांच्या वतीने भव्य राज्यस्तरिय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र केसरी सिंकदर शेख यांना आमंत्रीत करण्यात आले होते. यावेळी भव्य असे आयोजन



पार पडले. दरम्यान श्री महाकाली क्रिडा महोत्सवच्या दोन्ही सिजन मध्ये चंद्रपूरातील पै. हितेश सोनवणे या कुस्ती पटून ६१ किलो वजन गटात प्रथम पारितोषिक पटकाविले होते. या क्रिडा महोत्सवात बाहेरच्या अनेक मोठ्या कुस्ती पटुंची डावपेच पहाता आले व शिकता आले. हे आयोजन चंद्रपूरच्या कुस्ती पटुंसाठी कार्यशाळा सारखे होते. त्यामुळेच नाशिक येथील स्पर्धेत मला यश मिळवता आले. चंद्रपूरमध्ये पार पडलेल्या श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवात अनेक मोठ्या कुस्ती पटुं सोबत खेळता आले. त्यामुळे आत्मविश्वास वाढला असे सुर्वण पदक विजता पै. हितेश सोनवणे यांनी म्हटले आहे. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ आणि माता महाकालीची मुर्ती भेट स्वरुप देत हितेश चा सत्कार केला.चंद्रपूरच्या खेळांडुना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशातून आपण श्री माता महाकाली क्रिडा महोत्सव घेत असतो. आज हितेशच्या यशाने या महोत्सवाचा उद्देश पूर्ण झाला आहे. हितेशने चंद्रपूरला पहिले राज्य स्तरीय सुवर्ण पदक मिळवून दिले आहे. त्याने चंद्रपूरचे नाव लौकीक केले असून चंद्रपूरात आणखी खेळाडू घडेल असा विश्वास आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला आहे. यावेळी हितेश चे प्रशिक्षक सुहास बनकर यांचीही उपस्थिती होती.

## धनुष्यबाणाचे बटन दाबून ठाकरेंचा टांगा पलटी करायचाय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**कोल्हापूर**–धनुष्यबाणाचे बटन दाबून उद्धव ठाकरेंचा टांगा पलटी करायचा आहे. ठाकरेंची मशाल चिलीम होणार आहे असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंना लगावला आहे. कोल्हापूर लोकसभेचे शिवसेनेचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ कागलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंसह काँग्रेस नेते राहुल गांधींवर निशाणा साधला आहे.

यावेळी बोलतांना एकनाथ शिंदे म्हणाले, ''काँग्रेसचे उमेदवार मतदारसंघ सोडून पळत आहेत. २०१४ नंतर एक तरी बॉम्बस्फोट झाला आहे का? देशासाठी २४ तास काम करणारा पंतप्रधान पाहिजे की परदेशात जाऊन गार गार वारा खाणारा पाहिजे? ४ तारखेला या काँग्रेसचा बदला घेणार ना? असा सवाल एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला. तसेच तळपत्या सूर्याप्रमाणे महाविकास आघाडी जाळून टाकायची आहे अशी टीका शिंदेंनी केली.पुढे शिंदे म्हणाले, ''मोदींनी १० वर्षात केलेलं काम आणि ६० वर्षे काँग्रेसने देशाला खड्ड्यात घातलेला काळ पाहा. घरात बसलेल्या व्यक्तीला मत देणार का? फेसबुकवर बोलणाऱ्या व्यक्तीला मतदान करणार? स्वतःच्या स्वार्थासाठी, खुर्चीसाठी काँग्रेसला डोक्यावर घेतले असे म्हणत शिंदीनी उद्धव ठाकरेंना लक्ष केले आहे.पुढे शिंदेंनी विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. ते म्हणाले, ''हसन मुश्रीफ, समरजित घाटगे, संजय मंडलिक असा त्रिवेनी संगम इथं झाला आहे. त्यामुळं कोल्हापुरातील महायुतीच्या दोन्ही जागा मोठ्या फरकाने जिंकणार. पहिल्या आणि दुसऱ्या फेजमध्ये महायुतीला प्रतिसाद मिळाला तसाच प्रतिसाद तिसऱ्या फेजमध्ये देखील मिळेल. कडक उन्हाळा असून देखील महायुतीचे सर्व कार्यकर्ते काम करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले काम आणि महायुतीने महाराष्ट्रात केलेले काम याची पोचपावती जनता दिल्याशिवाय राहणार नाही'', असे शिंदे म्हणाले.

# शाश्वत उपजीविकेची संधी देणारे 'विज्ञान आणि तंत्रज्ञान संसाधन केंद्र'

**गडचिरोली । प्रतिनिधी**

विज्ञान आणि तंत्रज्ञान संसाधन केंद्र (डढठउ) हे गोंडवाना विद्यापीठाच्या सहकार्याने स्थापन झालेली एक स्वायत्त संस्था आहे. एस.टी.आर.सी.कडे विशेषत: गडचिरोली विभागातील उपेक्षित असलेल्या आदिवासी समुदायांसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करून उपजीविकेच्या संधी निर्माण करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच शाश्वत मूल्य निर्मितीसाठी उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून मानवी क्षमता विकासासाठी स्थानिक संसाधने, संबंधित ज्ञान आणि योग्य तंत्रज्ञानाचा लाभ एस.टी.आर.सी. देत आहे. त्यासोबतच, गडचिरोली क्षेत्राच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित विकासासाठी उत्प्रेरक म्हणून विद्यापीठाचे ज्ञान-आधारित उपक्रम व क्षेत्रातील उपजीविका वाढ यांच्यातील दुवा म्हणून विज्ञान आणि तंत्रज्ञान संसाधन केंद्र (डढठउ) कार्य करीत आहे. त्यामुळे एस.टी.आर.सी.या भागातील स्थानिकांना शास्वत उपजीविकेची संधी देणारे केंद्र बनले आहे.

एस.टी.आर.सी.स्पष्टपणे परिभाषित प्रभाव प्रेरित उद्दीष्टांची कल्पना करते. ज्यामध्ये, एस अँड टी (डढ) आधारित उपजीविका उपक्रमांची रचना, किफायतशीर तंत्रज्ञानासाठी संशोधन आणि उष्मायन, त्याचे हस्तांतरण आणि अवलंब, ज्ञान-कौशल्य आणि तंत्रज्ञानाद्वारे मानवी क्षमतांचा सर्वांगीण विकास, शाश्वत उत्पन्न निर्मितीसाठी नैसर्गिक संसाधनांच्या सानिध्यात ग्रामीण उपक्रम, विकास आणि संबंधित उपक्रमांचा विस्तार करण्यासाठी आयसीटी (खउढ ) च्या माध्यमातून विकासासाठी संवाद आदी विस्तृत विषयांचा समावेश करण्यात आला आहे.एस.टी.आर.सी.ने विविध उपक्रमावर यशस्वीरित्या काम केले आहे. त्यासोबतच, उत्पादन आणि मूल्यनिर्मिती योजनेतून मत्स्यपालन उपजीविका, बांबू कला उपजीविका, गौण वनउपज, औषधी वनस्पती या उपजीविका विभागासोबतच संशोधन आणि शैक्षणिक कार्यक्रम विकास, माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकासासाठी संवाद आदी विभाग विकसित केले आहेत.

उपजीविका विभाग व उद्दिष्टे:

मत्स्यपालन उपजीविका:*स्थानिक मत्स्य शेतकऱ्यांसाठी उत्कृष्ट दर्जाचे मत्स्यबीज आणि खाद्य यांच्या वाढीव उत्पादन व उपलब्धतेवर लक्ष केंद्रित करणे. मत्स्यउत्पादक गटाच्या माध्यमातून मत्स्य व्यवसायाला चालना देण्यासाठी प्रगत आणि शाश्वत दृष्टीकोन बाळगणे.

बांबूकला उपजीविका: बांबू आधारित उपजीविका क्षेत्रात कारागीर केंद्रित दृष्टीकोन असलेली उद्योजकीय इको-सिस्टम विकसित करणे, विशेष क्षमता निर्माण कार्यक्रमांची रचना करणे, युटिलिटी क्राफ्ट आणि लाइफस्टाइल प्रोडक्ट स्पेसमध्ये प्रोडक्ट पोर्टफोलिओ विकसित करण्यासाठी नाविन्यपूर्ण किफायतशीर क्राफ्टटूल्स तयार करणे, समुदायाच्या नेतृत्वाखालील बहु-भागधारक विकास आराखड्याद्वारे वित्तीय संस्था आणि स्थानिक उपक्रम यांच्यातील संबंध प्रस्थापित करणे. गौण वनउपज, औषधी वनस्पती आणि इतर उपजीविका: उत्कृष्ट वनसंवर्धन आणि कृषी पद्धतीद्वारे




रोजगार सुनिश्चित करणे, उपयुक्त संशोधनाद्वारे किफायतशीर साधने, तंत्रज्ञान आणि त्यांचा व्यापक प्रचार, गौणवन उत्पादनाभोवती सामुदायिक उपक्रम विकास करणे ज्यामुळे शाश्वत उत्पन्न निर्मितीस चालना मिळेल.

संशोधन आणि शैक्षणिक कार्यक्रम विकास: वैज्ञानिक ज्ञान, कौशल्य आणि तंत्रज्ञान या क्षेत्रामध्ये मानवी क्षमताविकास सक्षम करण्याकरीता शैक्षणिक कार्यक्रम तयार करणे, संशोधन आणि नवोपक्रमाद्वारे शैक्षणिक-अशैक्षणिक संशोधन आणि विकास सुलभ करणे, ज्ञान, भागीदारी, इंटर्नशिप, संशोधन अभ्यास आणि सर्वेक्षणासाठी संसाधन संस्था, विद्यापीठे, सरकारी संस्था आणि एनजीओ सोबत सहयोगी प्रयत्न करणे.

माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकासासाठी संवाद: माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करुन जनजागृती करण्यासाठी एक साधन म्हणून ज्ञान, सक्षम विकास आणि दुर्लक्षित समुदायांचे सक्षमीकरण, मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे विविधता असलेल्या प्रेक्षकांकरीता माहितीपूर्ण तसेच शैक्षणिक विकास संप्रेषण संसाधने डिझाइन करणे आदी उद्दीष्टे आहेत.

एस.टी.आर.सी.अंतर्गत अभिनव उपक्रम:वैद्य चिकित्सालय: स्थानिक नागरिकांमध्ये पारंपारिक वैद्य आणि त्यांच्या उपचार पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी एक अद्वितीय विद्यापीठ स्तरावरील व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

वैदू डिरेक्टरी: स्थानिक पारंपारिक उपचार करणारे वैद्य आणि वनस्पती आधारित उपचार पद्धतीची नोंदवही. मॉडेल प्रोडक्शन युनिट: प्रशिक्षित कारागिरांचे समूह तयार करणे, नाविन्यपूर्ण उत्पादन संशोधन, बहुस्तरीय उद्योजकता नेटवर्क आणि प्रोटोटाइप विकसित करण्यासाठी केंद्र. बांबूमध्ये डिप्लोमा,उद्योजकता व रचना: बांबू उद्योजकता केंद्रित अभ्यासक्रमासह बांबू क्षेत्रातील कुशल तज्ञांद्वारे मानव संसाधन तयार करण्याकरीता प्रकल्प तयार करण्यात आला आहे. शास्त्रोक्त पद्धतीने काढणी, सुयोग्य साठवण पद्धती, व प्रमुख गौण वनउपजांचे एकत्रीकरण: निवडक गौण वनउपजांचे एकत्रीकरणासाठी वैज्ञानिक काढणी आणि साठवण पद्धतीद्वारे रोजगार सुनिश्चित करणे. आदिवासी शाळांमध्ये पर्यावरण शिक्षण: अनौपचारिक मॉड्यूल 'वर्गाच्या पलीकडे' आधारित इकोलॉजी आणि पर्यावरणाचे तसेच जैवविविधतेचे महत्त्व लहान मुलांना शिकवण्यासाठी अभिनव उपक्रम. बांबू आधारित समुदाय उद्यमशीलता: जनसमुदाय एकत्रीकरण मोहीम, प्रशिक्षण, क्षमता निर्माण कार्यक्रमामुळे लघुउद्योग समूहांची स्थापना. वेबआधारित समुदाय संवाद प्लॅटफॉर्म: स्थानिक विकासाच्या उपायांसाठी, सामाजिक तसेच तांत्रिक सहाय्य प्रदान करण्यासाठी द्वि-मार्गी समुदाय संवाद मंच. फिरते प्रात्यक्षिक युनिट: चित्ररथाद्वारे ऑडिओ-व्हिज्युअल परस्पर संवाद प्लॅटफॉर्म जे स्थानिक समुदायांना सक्षम करण्यासाठी, जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि माहितीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी वापरला जातो.


# दास कॅपिटालचे उर्वरीत खंड प्रसिद्धकर्ते!

**कार्ल मार्क्स यांच्या विचारांची लोकप्रियता सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर कमी झाली असली तरी ते विचार शिक्षण क्षेत्र, राजकीय क्षेत्र, कामगार लढा यामध्ये अजूनही लोकप्रिय आहेत. मार्क्स यांचे विचार अनेक कम्युनिस्ट राज्ये आणि राजकीय चळवळींमध्ये अजूनही आदर्श मानले जातात. ते वर्ग संघर्षाचे प्रणेते होते. सदर ज्ञानवर्धक संकलित लेख श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी वाचक सेवेत प्रस्तुत करताहेत... संपादक.**

कार्ल मार्क्स हे १९ व्या शतकातील एक जर्मन अर्थशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ होते. त्यांनी अनेक विषयांवर लिखाण केले पण त्यांचे वर्गसंघर्षावरील लिखाण हे जास्त प्रसिद्ध आहे. फ्रेडरिक एन्जेल्सप्रमाणे मार्क्सने देखील तत्कालिन राजकीय लढ्यांमध्ये भाग घेतला. कार्ल मार्क्स यांनी दास कॅपिटाल या ग्रंथाचा पहिला खंड इ.स.१८६७मध्ये प्रसिद्ध केला. कार्ल मार्क्स यांच्या विचारांची लोकप्रियता सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर कमी झाली असली तरी ते विचार शिक्षण क्षेत्र, राजकीय क्षेत्र, कामगार लढा यामध्ये अजूनही लोकप्रिय आहेत. मार्क्स यांचे विचार अनेक कम्युनिस्ट राज्ये आणि राजकीय चळवळींमध्ये अजूनही आदर्श मानले जातात. ते वर्ग संघर्षाचे प्रणेते होते

डॉ.कार्ल मार्क्स यांचा जन्म दि.५ मे १८१८ रोजी जर्मनीतील ट्रायर या गावी झाला. त्यांचे वडील –हाईनलँड येथे वकिलीचा व्यवसाय करीत असत. बॉन विद्यापीठात विधी शाखेची पदवी मिळवल्यानंतर त्यांनी बर्लिन विद्यापीठात डॉक्टरेट पदवी मिळविण्यासाठी प्रवेश घेतला. इ.स.१८४१मध्ये त्यांचा प्रबंध मान्य होऊन त्यांच्या नावामागे डॉक्टर ही उपाधी लागली. डॉ.मार्क्स यांचा सामाजिक चळवळीवरील प्रभाव अतुलनीय आहे. ते स्वतः एक उत्कृष्ट अर्थशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ होते. जर्मनीतील जेना विद्यापीठामध्ये कायदा आणि तत्त्वज्ञानाचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पत्रकार म्हणून काम सुरू केले. डॉ.कार्ल मार्क्स यांनी इ.स.१८४८ रोजी कम्युनिस्ट विचारसरणीचा पाया घातला. फ्रेडरिच एन्जेल्स यांच्या सहकार्याने लिहिलेल्या कम्युनिस्ट मॅनिफेस्टोत त्यांनी कामगार–मजूर वर्गाने क्रांती करून कम्युनिस्ट समाज स्थापन करावा असा विचार मांडला. मार्क्स यांनी स्वतः समाजवादाची स्थापना केली नसली तरी समाजवादावर त्यांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव आहे. त्यांच्या स्फोटक विचारांमुळे त्यांना पॅरिस, ब्रसेल्स आणि नंतर लंडन येथे हद्दपार करण्यात आले. फ्रेडरिक एन्जेल्स यांनी मार्क्स यांच्या टिपणांच्या आधारे दास कॅपिटालचे उर्वरीत दोन खंड लिहून प्रसिद्ध केले.

कार्ल मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादात द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऐतिहासिक भौतिकवाद, अतिरिक्त मूल्य सिद्धांत, वर्गसंघर्ष, राज्यविहीन व वर्गविहीन समाज या साऱ्या विचारांचा समावेश



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.**

होतो. धर्म दुबळ्या माणसाला भ्रामक सुख, आभासात्मक सुख देतो. त्याची ती गरज आहे, भ्रम आहे. धर्माच्या रूपाने व्यक्त होणारे दुःख हे एकाच वेळी खऱ्या दुःखाचे प्रकटरूप असते आणि त्याच वेळी तो खऱ्या दुःखाचा निषेधही असतो. धर्म हा दबलेल्यांचा, दीनदुबळ्यांचा आवाज असतो. धर्म हृदयशुन्य जगाचे हृदय असते. धर्म हा निरुत्साही परिस्थितीतला उत्साह असतो. धर्म लोकांची अफू आहे. खरे सुख न देता, तो अफूसारखी गुंगी देतो. उत्पादन व्यवहार, उत्पादनशक्ती, उत्पादनसंबंध, त्यातील अंतर्विरोध, खाजगी मालकी, शासनसंस्था, विचारसरणी, क्रांती इत्यादी मूलभूत संकल्पनांचा विचार करून मार्क्सने मानवाचा उत्पादन व पुनरुत्पादनाचा व्यवहार, त्यातील उत्पादनशक्ती व उत्पादनसंबंध यांचे द्वंद्वात्मक नाते यांच्या आधारे इतिहासाचा तसेच त्याच्या काळातील वर्तमानाचा अभ्यास केला. या अभ्यासातूनच त्याने निष्कर्ष काढला की मानवी इतिहास हा वर्गलढ्याचा इतिहास आहे व उत्पादनसाधनांवरची भांडवली खाजगी मालकी हे आजच्या सर्व प्रश्नांचे मूळ आहे.

हेगेलच्या म्हणण्यानुसार मानवी मनात एक विचार निर्माण होतो– वाद, त्याच्यातील उणिवा किंवा अंतर्विरोध म्हणजे प्रतिवाद असतो. वाद व प्रतिवादाच्या संघर्षात्मक समन्वयातून सुसंवाद निर्माण होतो आणि ही प्रक्रिया अव्याहतपणे सुरू राहते. जाणिवा या इतिहासाच्या चक्रातील प्रेरक घटक असतात असे हेगेलचे म्हणणे होते. मार्क्सला मात्र जडद्रव्य किंवा पदार्थ अधिक महत्त्वाचे वाटले. मार्क्सने विचाराऐवजी पदार्थ महत्त्वाचा मानला. पदार्थ हेच मार्क्सने अंतिम सत्य मानले. आपल्या प्रतिपादनाच्या पुष्ट्यर्थ त्याने आधी भूमी पाहिल्यावरच माणसाच्या मनात बी पेरण्याचा विचार आला, असा दृष्टांत दिला. दास कॅपिटल या ग्रंथात मार्क्स म्हणतो, हेगेलचे तत्त्वज्ञान डोक्यावर उभे असल्याचे पाहून मी त्याला पायावर उभे केले. पदार्थ अस्तित्वात येतो, विकसित होतो, कालांतराने नष्ट होतो व त्यातून नवीन पदार्थ निर्माण होतो. द्वंद्व–परिवर्तन–विनाश–निर्मिती अशी प्रक्रिया सदोदित चालू राहते. 'जाणीवबुद्धी' ही भौतिक जगाच्या प्रदीर्घ उत्क्रांतीची केवळ एक निर्मिती मात्र आहे, असे भौतिकवादी म्हणतात. तत्त्वज्ञांनी वेगवेगळ्या मार्गांनी जगाचा केवळ अर्थ लावला आहे; पण मुख्य मुद्दा आहे तो जग बदलविण्याचा. मार्क्सने इतिहासाचा भौतिक अन्वयार्थ– इकॉनॉमिक इंटर्प्रिटेशन ऑफ हिस्ट्री असा शब्दप्रयोग केलेला आहे. इतर संज्ञा फ्रेड्रिख एन्जेल्सने रूढ केलेल्या आहेत. राज्याचा आधार पाशवी शक्ती हाच असतो. वर्गीय हितसंवर्धनाच्या गरजेतून शोषकांनी राज्याची निर्मिती केली. सर्वांचे कल्याण हा कधीच राज्याचा हेतू नसतो. राज्ये सर्वांच्या कल्याणासाठी नसल्यामुळे ती विलयाला गेलीच पाहिजेत. मार्क्सच्या मते हातांनी करायचे काम हे बौद्धिक कामापेक्षा अधिक महत्त्वाचे असते.

उत्पादन ही सामाजिक अभिक्रिया आहे. तिच्यामुळेच समाज उदयाला आला. 'माणूस हा निसर्गतः सामाजिक आहे, उदारमतवादच्या म्हणण्याप्रमाणे तो अण्वात्मक नाही. असे मार्क्सचे म्हणणे आहे. एकदा समाजाची आर्थिक संरचना कळाली की समाजातील इतर संरचना सहजपणे समजून घेता येऊ शकतील, असे मार्क्सला वाटते. इमल्याचा पायावर अजिबात प्रभाव पडत नाही, असे मार्क्सचे म्हणणे नव्हते या गोष्टीवर भा.ल.भोळे जोर देतात. आर्थिक संरचनेमध्ये उत्पादनाची साधने, उत्पादनाचे प्रेरक आणि उत्पादनाचे संबंध यांचा समावेश होतो. उत्पादनाच्या साधनांना उत्पादनाचे घटक अशीही संज्ञा आहे. सरंजामशाहीत जमीन हा तर भांडवलशाहीत भांडवल हा उत्पादनाचा घटक असतो. उत्पादनाच्या प्रेरकांमध्ये उत्पादनासाठी कोणत्या प्रकारचे बल वापरले जाते किंवा कोणत्या प्रकारची यंत्रसामग्री किंवा तंत्रज्ञान वापरले जाते याचा समावेश होतो. उत्पादनाच्या संबंधांमध्ये असलेले आणि नसलेले असे दोन गट येतात. या दोन गटांच्या हितांमध्ये मेळ बसत नसल्याने वर्गसंघर्षास प्रारंभ होतो. इतिहासपूर्व अवस्था, गुलाम बाळगणारा समाज, सरंजामशाही, भांडवलशाही आणि साम्यवाद अशा इतिहासाच्या पाच अवस्था मार्क्सने सांगितलेल्या आहेत. भांडवलदार ज्याप्रमाणे माणसाचे शोषण करतात, त्याचप्रमाणे ते निसर्गाचेही शोषण करतात. नफा कमावणे हा त्यांचा एकमेव हेतू असल्याने नफा कमावण्यासाठी ते माणसाचे शोषण करतात, त्याचप्रमाणे ते निसर्गाचेही शोषण करतात. शासनसंस्था, राजसत्ता हे प्रस्थापितांच्या हातामध्ये ठेवून समाजाचे परिवर्तन करता येणार नाही.मार्क्सला श्रमविभागणी मान्य आहे. अगदी प्रागैतिहासिक काळातही स्त्री–पुरुष आणि शिकारी व अन्नसंग्राहक अशी विभागणी असू शकते. मात्र विशिष्ट प्रकारचे श्रम करणारा श्रेष्ठ आणि बाकी हलक्या दर्जाचे अशी परिस्थिती निर्माण होणे हे संघर्षाचे मूळ ठरले असेल, असे तो म्हणतो. उदाहरणार्थ सरंजामशाहीत बुद्धिजिवींची कामे ही श्रेष्ठ दर्जाची समजली जात होती. बुद्धिजीवी आणि गुलाम अशी विभागणी ही पहिली अनैसर्गिक श्रमविभागणी होती, असे मार्क्स म्हणतो. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी भौतिक श्रमांपेक्षा तर्कबुद्धी श्रेष्ठ या भूमिकेचे समर्थन केले होते. कल्पना किंवा जाणिवा या पदार्थापेक्षा श्रेष्ठ आहेत अशी भूमिका घेण्यामागे आणि प्रत्येकामधील तर्कबुद्धीचा अंश एकसारखा नसतो असे म्हणण्यामागे फार मोठे उद्दिष्ट आहे, असे मार्क्सला वाटते. उत्पादनाच्या पद्धतीतील हिंसात्मक बदल म्हणजे क्रांती. खऱ्या जाणिवा आणि चुकीच्या जाणिवा असा भेद मार्क्सने केला आहे. आपल्या जाणिवांवरून आपले अस्तित्व ठरत नसून आपल्या अस्तित्वाचा आपल्या जाणिवांवर निर्णायक प्रभाव पडतो असे मार्क्स म्हणतो. आपण राहत असलेल्या जगाचे खरे स्वरूप श्रमिकांनी समजावून घेतले पाहिजे. आपल्या शोषणाची जाणीव त्यांना झाली पाहिजे. विचारप्रणाली किंवा धर्माच्या अफूने श्रमिकांची दिशाभूल होते, असेही मार्क्सला वाटते. अशा या विचारवंताचे दि.१४ मार्च १८८३ रोजी दुःखद निधन झाले.

!! कार्ल मार्क्स यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!

# सांगोल्याच्या हक्काचे पाणी अकलूजकरांसह बारामतीकरांनी पळवले–आ.शहाजीबापू पाटील

## पाणी आणणाऱ्या खा.रणजितसिंह निंबाळकरांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन

**सांगोला । प्रतिनिधी**

अकलूजकरांसह बारामतीकरांनी सांगोला तालुक्याच्या हक्काचे पाणी पळवून तालुका दुष्काळाच्या खाईत लोटला. शेतीच्या पाण्याच्या बाबतीत शरद पवारांसह मोहिते पाटील यांनी कायमच सांगोला तालुक्यावर अन्याय केला आहे. मात्र, विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी बारामतीकरांशी दोन हात करून सांगोला तालुक्याला हक्काचे पाणी मिळवून दिले. सांगोला तालुक्यात हरितक्रांती होण्यासाठी दुष्काळी भागाला पाणी वळवणारा खासदार म्हणून रणजितसिंह निंबाळकर यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आमदार. शहाजीबापू पाटील व माजी आमदार दीपकआबा साळुंखे– पाटील यांच्या



नेतृत्वाखाली सांगोला तालुक्यात गावभेट दौरा संपन्न झाला. कमलापूर, अनकढाळ, राजुरी, उदन वाडी, पाचेगाव, ह.मंगेवाडी, जुजारपूर, हातीद, सोमेवाडी, बुद्धेहाळ, गौडवाडी या गावात गावभेट दौरा करून मतदारांशी संवाद साधला. त्यानंतर जुनोनी येथे जाहीर सभा संपन्न झाली. यावेळी माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, अकलूजकरांसह बारामतीकरांनी शेतीच्या पाण्याबाबत सांगोला तालुक्यावर अन्याय केल्याची भावना शेतकऱ्यांच्या मनात आजही आहे. त्यामुळे सांगोल्याचं पाणी पळवणाऱ्या पवारांसह मोहिते पाटलांनी जनतेची दिशाभूल करू नये. गेल्या पाच वर्षांत शेतीच्या आणि पिण्याच्या पाण्याचे आवर्तन चांगल्या प्रकारे मिळाल्याने लोकसभा निवडणुकीत पाणीप्रश्न टर्निंग पॉईंट ठरला आहे. सांगोल्याच्या हक्काचे बारामतीकरांनी पळवून नेलेले पाणी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी पुन्हा हे पाणी दुष्काळी भागाला वळवले आहे. तालुक्यासाठी वरदायिनी ठरलेल्या टेंभू योजनेचा विस्तार करून अधिकचे दोन टीएमसी पाणी तालुक्याला मिळाले आहे. ऐन उन्हाळ्यात शेतीचा तसेच जनावरांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी टेंभू योजनेतून माण नदीत पाणी सोडले आहे. शरद पवारांनी सांगोला तालुक्याचा पाणीप्रश्न कायमस्वरुपी मिटवू अशी मावळत्या सूर्याला साक्ष मानून शपथ घेतली होती. मात्र, शरद पवार आणि मोहिते पाटील यांना पाणीप्रश्न सोडविण्यात सपशेल अपयश आले. विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी शेतकऱ्यांच्या शेतात पाणी आणल्याने त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.

# सांगोला पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी सिद्धेश्वर नागटिळक यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार संपन्न

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला पंचायत समिती येथे कार्यरत असलेले कृषी विस्तार अधिकारी सिद्धेश्वर जनार्धन नागटिळक हे मंगळवार दि.३० एप्रिल २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले . सेवानिवृत्ती निमित्त सिद्धेश्वर नागटिळक यांचा सत्कार सोलापूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर साहेब, गटविकास अधिकारी आनंद लोकरे साहेब यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच यावेळी सांगोला तालुका ग्रामसेवक संघटने तर्फे सन्मान करण्यात आला.यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी मिलिंद सावंत,उप अभियंता ठोंबरे साहेब, बालविकास प्रकल्प अधिकारी मोलाणे साहेब, कृषी अधिकारी दिपाली शेंडे, विस्तार अधिकारी प्रतिभा पवार, विस्तार अधिकारी वसंत फुले ,अमोल तोडकरी, अभिजीत पवार ,सर्व विस्तार अधिकारी , स.ले.अ.आनंद जाधव ,कक्ष अधिकारी स्वामी साहेब, महेश जाधव ,नागणे साहेब, अंगणवाडी पर्यवेक्षिका, ग्रामसेवक संघटना पदाधिकारी शहाजीराव इंगोले, बाळू शिंदे, राजकुमार ताटे, खान साहेब मुलाणी, तसेच सर्व ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी,तसेच कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

सिद्धेश्वर नागटिळक यांनी एकूण ३४ वर्ष ४ महिने नोकरी केली. सांगोला पंचायत समिती येथे १३ वर्ष कामकाज पाहिले .तर माळशिरस पंचायत समिती येथे ग्रामसेवक , ग्रामविकास अधिकारी पदावर १९ वर्ष व कृषी विस्तार अधिकारी पदावर २ वर्ष ४ महिने त्यांचा सेवा कार्यकाल आहे. तसेच त्यांना २०१८.१९ मध्ये जिल्हा परिषदेचा कृषिमित्र पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

सत्कारास उत्तर देताना त्यांनी सांगितले की , सांगोला पंचायत समिती येथे काम करीत असताना जिल्ह्याचे सर्व पदाधिकारी, अधिकारी ,तसेच सांगोला तालुक्यातील सर्व पदाधिकारी सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी ,शेतकरी बांधव ,ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सर्वांच्या सहकार्यामुळेच या पदावर प्रामाणिकपणे काम करू शकलो. त्याबद्दल सर्वांचे त्यांनी आभार व्यक्त केले. तसेच सत्कारप्रसंगी मान्यवरांनी त्यांचा सत्कार करीत त्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# अभिषेक काळे यांची श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या चरणी गायन सेवा

## श्री स्वामी समर्थ देवस्थान अक्कलकोट जपत आहे आध्यात्मिक सांस्कृतिक परंपरा



**अक्कलकोट । प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या १४६ व्या पुण्यतिथी निमित्ताने आयोजित धर्मसंकीर्तन सोहळ्यात ख्यातनाम गायक श्री.अभिषेक काळे सांगली यांची अप्रतिम गायन सेवा स्वामी समर्थ महाराजांच्या चरणी समर्पित झाली.सुरुवातीला श्री स्वामी समर्थ देवस्थान वतीने प्रथमेश महेश इंगळे,सचिव श्री.आत्माराम घाटगे, विश्वस्त श्री महेश गोगी, व्यवस्थापक श्रीशैल गवंडी यांच्या शुभहस्ते सर्व कलाकारांचे सत्कार करण्यात आले.त्यानंतर ओंकार पाठक यांनी प्रास्ताविक करत सांगितले की श्री स्वामी महाराजांच्या इच्छेनुसार गेली अनेक वर्षे धर्मसंकीर्तनात नामवंत कलाकारांची संगीत सेवा, कीर्तन, प्रवचन सेवा कार्यक्रम होतात.त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली.सुरुवातीला गणेश वंदना सुर निरागस हो या गाण्याने करत कानडा राजा पंढरीचा,माझे माहेर पंढरी,भाग्यदा लक्ष्मी बारंम्मा.निघालो घेऊन दत्ताची पालखी,काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल,अशा अनेक संतरचना गाऊन स्वामी भक्तांना मंत्रमुग्ध केले शेवटी येरे कृष्णा तिरीच्या वसणाऱ्या व स्वामी समर्थ गजराने अभंगरंगाची सांगता केली.त्यांना तितकीच अप्रतिम दमदार साथसंगत हार्मोनियम ओंकार पाठक तबला विवेक पोतदार पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे टाळ अक्षय सरदेशमुख यांनी केली.यावेळी अनेक स्वामी भक्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.धर्मसंकीर्तनात अनेक नामवंत मंडळी स्वामींची सेवा करण्यासाठी धन्यता मानतात.आणि श्री स्वामी समर्थ देवस्थान अतिशय सुंदर आयोजन नियोजन करत हा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्याची परंपरा कायम राखत आहे.

## संग्रामसिंह जाधवराव यांच्या मार्गदर्शनाखाली

# महायुतीचे उमेदवार खा.रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारास मतदार नागरिकांचा, उस्फुर्त प्रतिसाद

**सांगोला । प्रतिनिधी**

४३ माढा लोकसभा मतदारसंघाचे भाजप, शिवसेना , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,आरपीआय (आठवले गट) ,रासप, रयत क्रांती संघटना या पक्षांच्या महायुतीचे उमेदवार खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ सांगोला शहरातील लक्ष्मीनगर, मिरज रोड ,विजयनगर, शिवाजीनगर, रेल्वे लाईन–पूर्व पश्चिम बाजू, दत्तनगर, कर्मवीर नगर, शिक्षक कॉलनी, ब्रह्मचैतन्य नगर ,वासुद रोड ,सदानंद नगर ,अलराईन नगर ,कडलास नाका परिसर या ठिकाणी महायुतीचे, पदाधिकारी कार्यकर्ते यांनी होम टू होम प्रचार केला . संग्रामसिंह जाधवराव यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला शहरात जोरदारपणे प्रचार मोहीम सुरू आहे. .खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांना निवडून आणण्यासाठी कमळ चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रचारकांनी केले आहे . प्रचारकांच्या प्रचारास मतदार नागरिकाकडून उस्फुर्तपणे प्रतिसाद मिळत आहे

माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार,



खा.रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना माढा लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी पुन्हा निवडून आणण्यासाठी मतदारांनी खा .खासदारांची नाईक निंबाळकर यांना विजयी करून देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना पुन्हा संधी देण्यासाठी कमळाला मतदान करावे असे आवाहन महायुतीचे पदाधिकारी ,कार्यकर्ते यांनी केले आहे . तालुक्यातील शेती सिंचनाच्या अपूर्ण योजना इतर विकासाच्या योजना व कामे पूर्ण करण्यासाठी खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांना पुनश्च एकदा सेवा करण्याची संधी देण्यासाठी त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन प्रचारा दरम्यान करण्यात येत आहे.

सांगोला शहरातील या प्रचार दौऱ्यामध्ये माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा राणीताई माने ,मा.गटनेते तथा नगरसेवक आनंदाभाऊ माने, मा. नगराध्यक्ष नवनाथभाऊ पवार, मा. नगराध्यक्ष अनिलभाऊ खडतरे ,मा,नगरसेविका छायाताई मेटकरी, उद्योगपती आनंद घोंगडे, मा . नगरसेवक अस्मिर तांबोळी, मा. नगरसेवक सचिन लोखंडे,मा. नगरसेवक सोमेश यावलकर मा.नगरसेवक प्रा. संजय देशमुख नगरसेवक माऊली तेली चेअरमन लतिका मोटे, चेअरमन शोभाताई देशमुख, नितीन करने.प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिलिंग गावडे, चेअरमन प्रभाकर घोंगडे,शहराध्यक्ष प्रवीण जानकर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस आनंद फाटे, सुनील पवार, जय बनसोडे, श्रीनाथ बिडकर ,शिवाजी गावडे ,ज्ञानेश्वर गाडेकर, आनंद बनसोडे, वल्लभ चव्हाण, प्रवीण गावडे, आयुब जमादार, प्रमोद जाधव, ऋषी जानकर, युवा नेते काशिलिंग गाडेकर, अरुण पाटील, लखन पवार, नितीन काळे , चैतन्य राऊत, सचिन शिर्के, राहुल गेजगे, शहीद मुलाणी,अमर इंगोले, राजू शिंदे, रोहित शिर्के, प्रसाद शिर्के, गणेश करे, मोहसीन शेख, औदुंबर शिर्के, रियाज तांबोळी, संतोष लवटे, ,दीपक कोरे, , रेशमा मुजावर, अनुराधा माने, सुवर्णा जाधव ,अश्विनी दोलतडे,, सुमित कोल्हे ,सुवर्णा गडदे, करिश्मा मुजावर, ललिता खाडे , फर्जाना मुजावर, अरुणा माने, रुकसाना मुजावर, शोभा जाधव, मनीषा दहिवडकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाच वर्षांत सर्व भ्रष्टाचाऱ्यांवर कडक कारवाई होणार! झारखंड मधील सभेत पंतप्रधान मोदी यांची ग्वाही








**मुंबई । प्रतिनिधी**

जिथे सरकारे भ्रष्ट असतात तिथे निधीची कितीही तरतूद केली तरी विकास शक्य नाही, म्हणूनच आम्ही भ्रष्टाचार हटविण्याचा संकल्प करतो, तेव्हा इंडी आघाडीचे लोक भ्रष्टाचाऱ्यांना वाचविण्यासाठी मोर्चे काढतात. येत्या पाच वर्षात अशा सर्व भ्रष्ट लोकांवर वेगाने कडक कारवाई केली जाईल, आणि भ्रष्टाचार खणून काढला जाईल अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी झारखंडमधील पलामू आणि लोहरदगा येथे आयोजित केलेल्या विशाल जाहीर विजय संकल्प सभांमध्ये बोलताना दिली.

झारखंड भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री. बाबूलाल मरांडी, झारखंडचे विरोधी पक्षनेते व ज्येष्ठ नेते अमर कुमार बाउरी, विद्यमान खासदार व पलामूचे उमेदवार विष्णू दयाल राम, राज्यसभा खासदार सुदर्शन भगत, लोहरदगा उमेदवार व भारतीय जनता पक्षाचे अनुसूचित जमाती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. समीर उरांव, आजसू पक्षाचे अध्यक्ष सुदेश महतो आणि इतर नेते यावेळी मंचावर उपस्थित होते.

आपल्या तडाखेबंद भाषणात पंतप्रधान मोदी यांनी पुन्हा एकदा काँग्रेस आणि इंडी आघाडीवर जोरदार शरसंधान केले. इंडी आघाडीचे नेते जनहित आणि विकासाच्या मागणीसाठी नव्हे तर भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी रॅली काढतात, असे सांगून ते म्हणाले की, काँग्रेसने गेल्या ६० वर्षांत केवळ घराणेशाही, भ्रष्टाचार आणि तुष्टीकरण केले आहे. काँग्रेसच्या डावपेचांनी देशाला नक्षलवाद आणि माओवादाच्या रक्तरंजित हिंसेचा तडाखा दिला, पण आम्ही सत्तेवर आल्यानंतर देशाचा मोठा भाग माओवाद्यांच्या हिंसेतून मुक्त केला. आपली मते वाचवण्यासाठी काँग्रेस दहशतवाद्यांवर कारवाईही करत नाही, असा आरोपही श्री. मोदी यांनी केला. घुसखोरांना प्रोत्साहन देण्याचा आणि आदिवासींच्या जमिनी बळकावण्याचा घातक खेळ झारखंडमध्ये सुरू आहे. पीएफआयसारख्या बंदी घातलेल्या संघटना संथालमध्ये त्यांचे रॅकेट चालवत आहेत आणि आदिवासी महिलांवर अत्याचार करत आहेत. जेव्हा लोक या विरोधात आवाज उठवतात, तेव्हा इंडी आघाडी व्होट जिहादचे आवाहन करू लागते. काँग्रेसने कितीही जिहाद केले तरी हा देश मागे हटणार नाही, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. झामुमो-काँग्रेसच्या नेत्यांनी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अमाप संपत्ती गोळा केली आहे. मालमत्ता असो, राजकारण असो, ते आपल्या मुलांसाठी सर्व काही कमवत असतात. त्यांचा वारसा म्हणून ते बराच काळा पैसा मागे ठेऊन जातील, असा गंभीर आरोप याप्रसंगी बोलताना पंतप्रधानांनी केला.

आज पाकिस्तानचे नेते काँग्रेसच्या राजपुत्राला पंतप्रधान बनवण्याची प्रार्थना करत आहेत, पण सशक्त भारताला आता मजबूत सरकार हवे आहे आणि मजबूत सरकारसाठी मोदी सरकार हवे, ही देशाच्या जनतेची भावना आहे. जनतेच्या आशीर्वादाने मी मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून देशवासियांची सेवा करत असून गेल्या २५ वर्षांत माझ्यावर एका पैशाच्या घोटाळ्याचाही आरोप झालेला नाही. आजही मी पद, प्रतिष्ठा, सुख-समृद्धी यापासून दूर आहे, आणि हीच माझी ताकद आहे, असेही ते म्हणाले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आदिवासी महिलेला राष्ट्रपती बनवण्यास इंडी आघाडीने कडाडून विरोध केला होता. काँग्रेसच्या काळात रेशन सडत राहिले. आदिवासी भागातील मुले उपाशी मरत राहिली आणि काँग्रेसने धान्य गोदामांना टाळे ठोकले. आम्ही सर्व धान्य गोदामांचे कुलूप उघडले, आज देशात मोफत रेशनची योजना सुरू आहे. पुढील पाच वर्षे ही योजना चालू राहील याची मी हमी दिली आहे. झारखंडमध्ये रोज पेपरफुटीच्या घटना घडत असत आणि तरुणांच्या भवितव्याशी खेळले जायचे, पण आज केंद्रातील भाजपा सरकारने पेपरफुटी विरोधात कडक कायदा केला आहे. देशातील जनतेला कधीही संकटांनी भरलेले जीवन जगावे लागू नये यासाठी मी विकसित भारताचा वारसा देणार आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

मी गरिबीत जगलो आहे आणि गरिबांच्या अडचणीतून गेलो आहे. म्हणूनच माझ्या १० वर्षांच्या गरीब कल्याण योजना माझ्या जीवनातील अनुभवातून जन्माला आल्या आहेत. आज लाभार्थींना भेटल्यावर माझ्या डोळ्यात अश्रू तरळले असून या अश्रूंची किंमत फक्त गरिबीत जगलेली व्यक्तीच समजू शकते. ज्याने आपल्या आईला पोट बांधून झोपताना आणि शौचालया अभावी वेदना आणि अपमान सहन करताना पाहिले नाही, त्याला मोदींच्या या अश्रूंचा अर्थ समजू शकत नाही, असे सांगताना पंतप्रधान काहीसे भावुक झाले. पण काँग्रेसच्या राजपुत्रांना मोदींच्या अश्रूंमध्ये आपला आनंद दिसतोय आणि हे निराश आणि हताश झालेले लोक इतके उदास झाले आहेत की त्यांना मोदींचे अश्रू आवडू लागले आहेत. जाके पाँव फटे न फटे बिवाई, सो क्या जाने पीर पराई या उक्तीतून काँग्रेसच्या राजपुत्राची अवस्था सांगितली जाते. राहुल गांधी चांदीच्या चमच्याने जेवण करत राहिले, गरिबांच्या झोपडीत फोटो काढत राहिले पण गरिबांसाठी त्यांनी कधी काही केले नाही, असा आरोपही त्यांनी केला. आमच्या १० वर्षांच्या कार्यकाळात २५ कोटी देशवासीय गरिबीतून बाहेर आले आहेत, त्यामुळेच देशातील गरीब जनता मोदींना आशीर्वाद देत असून हे आशीर्वाद मोदींची शक्ती आणि भांडवल आहेत, असेही ते म्हणाले. मोदींना देशात रोजगार वाढवायचा आहे, लोकांच्या जीवनात समृद्धी आणायची आहे परंतु काँग्रेसचा डोळा सार्वजनिक मालमत्तेवर आहे. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात सार्वजनिक मालमत्तेचे एक्स-रे काढणे, त्यातील काही भाग जप्त करणे आणि ते आपल्या व्होट बँकांमध्ये वाटण्याची गोष्ट केली आहे. पण हे जनतेला अजिबात मान्य नाही. काँग्रेस आणि इंडी आघाडीने आणखी एक धोकादायक गोष्ट सांगितली आहे. भाजपाचा विजय झाला तर आरक्षण आणि राज्यघटना संपुष्टात येईल, असे खोटे काँग्रेस जनतेमध्ये पसरवत आहे. मात्र, गेल्या १० वर्षांपासून देशात भाजपाचे पूर्ण बहुमताचे सरकार आहे आणि भाजपाने आजपर्यंत असे कोणतेही पाऊल उचलले नाही, याकडेही त्यांनी देशाचे लक्ष वेधले. उलट भाजपाने इंडी आघाडी व काँग्रेसचे सत्य उघड केले असून त्यांनाच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे आरक्षण हिसकावून घ्यायचे आहे, असा आरोपही श्री. मोदी यांनी केला. देशात धर्माच्या आधारावर आरक्षण कधीही दिले जाणार नाही, असे संविधानकर्त्यांनी ठरविले होते, पण काँग्रेस-झामुमो आणि राजदसह संपूर्ण इंडी आघाडी आदिवासी, मागासवर्गीय आणि दलितांच्या आरक्षणावर दरोडा घालत असून विशिष्ट वर्गाला धर्माच्या आधारे आरक्षण देण्याचा त्यांचा इरादा आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसच्या या घोषणेला राजद आणि झामुमोची स्पष्ट संमती असली तरी मोदी जिवंत असेपर्यंत दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींच्या आरक्षणाला कोणी हात लावू शकणार नाही, संविधानाशी छेडछाड करू शकणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

## ६ मे रोजी होणाऱ्या भाजपा ओबीसी व भटक्या विमुक्त मेळाव्याची नियोजन बैठक संपन्न



**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर दक्षिण लोकसभेचे महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ जनतेचा अत्यंत मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. वेगवेगळ्या भागात प्रत्येक घटकांचे मेळावे होत आहे महिलांचे मेळावे होत आहे.नगर शहरात ओबीसी व भटक्या विमुक्त मोर्चाचा मेळावा ६ मे रोजी दातरंगे मळा येथील मार्कंडेय संकुल येथे संपन्न होणार आहे.भारतीय जनता पार्टीने ओबीसी समाजाच्या विकासासाठी जे काही काम केले आहे ते समाजापर्यंत पोहोचावे.मेळावा यशस्वी करण्यासाठी समाजातील सर्व घटकांचा समावेश करून सर्व वेगवेगळ्या समाजातील सर्व जातीतील सर्व पक्षातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. यासाठी आज नियोजन बैठक संपन्न झाली आहे.मेळावा यशस्वी करण्यासाठी ओबीसी समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे. रंगार गल्ली येथे महाले मंगल कार्यालय येथे ६मे रोजी होणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या वतीने ओबीसी भटक्या विमुक्त मोर्चाचे मेळाव्याची नियोजन बैठक भाजपा ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष किशोर डागवाले,मनसेचे शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर,अनिता दिघे,सुधाकर आव्हाड,निशांत दातीर,बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली मामा गायकवाड,अनिल इवळे,मच्छिंद्र बनकर,भटक्या विमुक्त आघाडीचे संदीप कुसळकर,सोनार समाजाचे गोपाल वर्मा,नाभिक समाजाच्या अनिल निकम,परीट समाजाचे विनोद गायकवाड, जालिंदर बोरुडे,सुमित वर्मा,वकील आघाडीचे अध्यक्ष चंदन बारटक्के ,शेषराव फुंदे, पद्मशाली समाजाचे सुमित इप्पलपेल्ली, गणेश कानगावकर,साळी समाजाचे सचिन पावले, सतीश रासने, दीपक देहेरेकर, धोबी समाजाचे राजेंद्र शिरसाठे, श्रीकांत फंड, दत्ता गाडळकर, अँड.राहुल रासकर, माळी महासंघाचे गणेश बनकर, राजेंद्र एकाडे, शिवसेनेचे युवा आघाडीचे महेश लोंढे,शुभम काकडे,ओंकार लेंडकर,काशी कापडी समाजाचे सुनील भिंगारे,राजू वाडेकर, अधिवक्ता परिषदेचे सुनिल सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

फोटो कॅप्शन-भाजपा ओबीसी व भटक्या विमुक्त मेळाव्याची नियोजन बैठक संपन्न

## व्यक्ती, संस्थांना माध्यमांमध्ये जाहिरात देताना मतदार जनजागृतीसाठी आवाहन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

येत्या ५ मे ते १३ मे पर्यंत विविध प्रकारचे सण ,जयंती, उत्सव ,पुण्यतिथी तसेच अक्षयतृतीया,जागतिक मातृदिन यासारखे महत्त्वाचे व प्रेरणादायी उत्सव आहेत.हे औचित्य साधून अहमदनगर व शिर्डी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ च्या अनुषंगाने अहमदनगर जिल्हा स्वीप समितीने व्यक्ती, संस्थांना माध्यमांमध्ये जाहिरात देताना मतदार जनजागृतीसाठी आवाहन केले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या निर्देशानुसार मतदानाचे प्रमाण वाढण्यासाठी जिल्ह्यामध्ये विविध प्रकारचे उपक्रम वेग घेत आहेत.त्याचाच एक भाग म्हणून विविध सण- उत्सवानिमित्त विविध प्रिंट मीडिया, सोशल मीडिया, ऑडिओ-व्हिडिओ मीडिया या माध्यमातून विविध व्यक्ती ,संस्था ,दुकाने आपल्या व्यवसायवाढीसाठी वैयक्तिक , जाहिरातदारांच्या माध्यमातून जाहिरात देत असतात.त्यामध्ये लोकशाहीच्या मतदानाला महत्त्व देत राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जाहिरात देताना १३ मे रोजी आपले मतदान आहे, न विसरता मतदान करा यासारख्या एखाद्या ओळीचा राष्ट्रीय संदेश दिला तर त्याचा परिणाम लोकशाहीच्या समृद्धीसाठी होईल.राजकीय जाहिरातीत ही संकल्पना राबवता येणार नसून आचारसंहितेचे पालन आवश्यक आहे.अराजकीय वाढदिवस, उद्घाटने ,सांस्कृतिक सोहळ्यांबरोबरच ५ मे आंतरराष्ट्रीय बाल दिन,८ मे गुरुदेव रवींद्रनाथ टागोर जयंती- आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस दिन , जागतिक थॅलेसमिया दिन,१० मे -अक्षय तृतीया - महात्मा बसवेश्वर जयंती ,११ मे राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन,१२ मे जागतिक मातृदिन व परिचारिका दिन,१३मे अहमदनगर-शिर्डीचे मतदानाच्या दिवशी देखील सामाजिक बांधिलकी म्हणून विशेष जाहिरात देता येईल.अहमदनगर व शिर्डीच्या मतदार राजा जागा हो ..१३ मे रोजी लोकशाहीचा धागा हो ,एकच वादा १३ मे रोजी मतदानाचा इरादा,देशाचे ठेवून भान.. चला करू मतदान ,वृद्ध असो की जवान.. चला करू मतदान,जागरूक मतदार ..लोकशाहीचा आधार,आद्य कर्तव्य भारतीयांचे ..पवित्र कार्य मतदानाचे ,लोकशाहीचा सुदिन आहे ..आज मतदानाचा दिन आहे,मतदानासाठी वेळ काढा ..आपली जबाबदारी पार पाडा,निर्भय होऊन मतदान करा ..अधिकाराचा सन्मान करा,तुमचे मत अहमदनगर साठी महत्त्वाचे आहे. यासारखी घोषवाक्ये वापरता येतील. तसेच आपल्या मनातील मतदार जनजागृती विषयक संकल्पना देखील वापरता येतील.

## भारताला महासत्ता बनविण्यासाठी महायुतीला विजयी करा-सचिन जाधव

**अहमदनगर । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करून भारताला महासत्ता बनविण्यासाठी मोदी सरकार आले पाहिजे त्यासाठी नगर दक्षिणचे महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील याना मतदान करा असे आवाहन शिवसेनेचे संपर्क प्रमुख सचिन जाधव यांनी केले . महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ प्रभाग क्र.१५मध्ये नगरसेविका अश्विनी जाधव यांच्या पुढाकारातून प्रचार फेरी काढण्यात आली होती त्याप्रसंगी ते बोलत होते यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष ऍड अभय आगरकर,शिवसेना शहर प्रमुख दिलीप सातपुते,बंटी ढापसे,सुनील भिंगारे,गजेंद्र राशीनकर , प्रिया जानवे,रेणू करंदीकर,अनिता दिघे,बाबासाहेब सानप,अनिल निकम,ओंकार शिंदे,पोपट पाथरे,आनंदराव शेळके,अनिल सबलोक,बाळासाहेब भुजबळ,सुरेखा विद्ये आदिंसह भाजपा,शिवसेना, मनसे,आप आदी महायुतीचे सर्व पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते. प्रचारफेरीची सुरुवात कोंड्यामामा चौकातून झाली रामवाडी,गोकुळवाडी,कौलारू कॅम्प, सर्जेपुरा, शिपिगल्ली, वंजारगल्ली परिसरातील मध्ये फिरून सांगता झाली.



## लोणीच्या पाहुण्याला घरी पाठवा ! प्रभावती घोगरे यांचे आवाहन

**पारनेर । प्रतिनिधी**

मतदारांनो जागृत व्हा, पाहुणे-रावळे सांभाळायचे बंद करा. लोणीच्या पाहुण्याला त्याच्या घरी पाठवून देण्याची वेळ आली असल्याचे सांगतानाच लोणीच्या साम्राज्याविरोधात लढणाऱ्या नीलेश लंके यांना विजयी करण्याचे आवाहन कृषीभुषण प्रभावती घोगरे यांनी केले.

पारनेर तालुक्यातील पोखरी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेमध्ये घोगरे या बोलत होत्या. यावेळी पोखरी परिसरातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता.



यावेळी बोलताना घोगरे म्हणाल्या, आगोदर तुम्ही राज्य व्यवस्थात चालवा, देशाची चिंता कशाला करता ? घरातच खायला नाही, बाकीच्या लोकांना मात्र काहीच्या काही आश्वासने दिली जातात. राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालास मोल कसे मिळेल ? तो स्वयंपुर्ण कसा होईल ? याकडे दुर्लक्ष केले जाते. आज शेतकऱ्यावर जी वाईट वेळ आहे ती कोणावरही नाही. वीज, पाणी, रस्ते या तीन मुलभूत गरजा शेतक-याच्या आहेत.आठ तास वीज मीळते ति देखील रात्रीची. डीपी जळाल्यावर दोन दोन दिवस वीज नसते. यावर उपाय शोधले पाहिजेत. त्यासाठीच आम्ही तुम्हाला निवडूण दिले आहे. आबकी बार चारसो पार, मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी नाही असे घोगरे यांनी ठणकाउन सांगितले.

यावेळी गंगाराम बेलकर, बापूसाहेब शिर्के, अॅड. राहुल झावरे, अशोक घुले, गोरख आहेर, राजेंद्र चौधरी, प्रकाश गाजरे, बाळू शिंदे, योगेश पवार, रवी गायके, पप्पू गुंड, पोपट गुंड, अजित भाईक, सुवर्णा आहेर, सुरेखा डोंगरे, अभिजित झावरे, अमोल उगले यांच्यासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता. नीलेश लंके शेतकरी कुटूंबातील माणूस एवढया हिमतीने मोठया शक्तीविरूध्द लढा देत आहेत. पारनेरकरांनी त्यांना हिंमत देण्याचे, पाठीशी खंबीर उभे राहण्याचे काम केले पाहिजे. पारनेर तालुक्याला सुवर्णसंधी मिळाली असून नीलेश लंके यांना दिल्लीला पाठवून ही हुकुमशाही, दडपशाही संपविण्याचे आवाहन घोगरे यांनी केले.त्यांचे वास्तव्य शिर्डी मतदारसंघामध्येच असते. तुमचा उपयोग फक्त मतांपुरता केला जाणार आहे. निवडणूकीपुरते तुमच्याकडे येणे राहिल. तुम्हाला विचारले जाईल. त्यानंतर ज्याच्या त्याच्या घरी तो जाईल. पाहुणा किती दिवस राहू शकतो ? दोन दिवस, चार दिवस. त्याला आपल्या घराची ओढ असते. असे सांगत घोगरे यांनी पाहुण्याला घरी पाठविण्याचे आवाहन केले.नीलेश लंके मोठया साम्राज्याविरोधात लढा देत आहेत. शरद पवार, बाळासाहेब थोरात यांच्यासारखे धुरंधर नेते आपल्या पाठीशी उभे आहेत. शरद पवारांवर टीका केली म्हणजे तुम्ही महाराष्ट्रात मोठे होत नाहीत. शरद पवारांनी शेतकऱ्यांचे विविध प्रश्न मार्गी लावले. राहुरी कृषी विद्यापीठात संकरीत गाईंसाठी मोठे युनिट उभे केले. मांजरी येथे उस संशोधन केंद्र सुरू केले आहे. एमआयटी पार्क उभे केले. विखे यांनी सहकारी संस्था सोडून शेतकऱ्यांसाठी काही केले का असा सवाल घोगरे यांनी केला.राहता तालुक्यातील शिक्षण संस्था, साखर कारखान्याचे कामगार नगर दक्षिण मतदारसंघात आले आहेत. तुमच्याकडे हे लोक येऊन सांगू लागले की विखे यांना मत द्या तर तुम्ही सांगाल की चहा प्या. बस नसेल तर मुक्काम करा. मत कोणाला द्यायचे ते आमचे आम्हाला कळते. यांचे कामगार तुम्हाला येऊन सांगणार.

## जनता वोट जिहादचे राजकारण सोडून मताधिक्य देऊन भाजपला निवडून देतील-डॉ.खा.दिनेश कुमार शर्मा



**अहमदनगर । प्रतिनिधी**

मतांच्या तुष्टीकरणासाठी फतवे काढून कुणी राजकारण करणार असेल तर त्याला जनता थारा देणार नाही. जनता 'वोट जिहादचे राजकारण' झुगारून देऊन मतांची क्रांती करून राष्ट्रवादाला पाठबळ देईल असा विश्वास उत्तरप्रदेशचे माजी उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे प्रभारी खासदार डॉ. दिनेशकुमार शर्मा यांनी व्यक्त केला.

खासदार दिनेश शर्मा यांनी नगर दक्षिण आणि शिर्डी लोकसभा मतदार संघाचा दोन दिवस दौरा केला. संघटनात्मक पातळीवर पदाधिकारी, कार्यकर्ते युवा वॉरियर्स यांच्याशी संवाद साधून निवडणुकीतील बारकावे त्यांनी जाणून घेतले. नगरमध्येही युवा वॉरियर्स या मेळाव्यात त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

माध्यमांशी बोलताना डॉ.शर्मा म्हणाले की, राज्यात महायुतीला मोठे यश मिळणार असून २०१९ च्या विधानसभेत राज्यातील जनतेने दिलेल्या जनादेशाचा अवमान करणाऱ्यांना चांगलाच धडा शिकवेल. विरोधकांमध्ये आता कोणताही आत्मविश्वास राहिला नाही. विरोधी आघाडीतील प्रत्येक पक्षाला आपल्या अस्तित्वासाठी झगडण्याची वेळ आली आहे. पराभव समोर दिसू लागल्याने फतवे काढून राजकारण करण्याची वेळ त्यांच्यावर आली असल्याची जोरदार टिका शर्मा यांनी केली. फतवे काढून वोट जिहादचे राजकारण करणे हे जनतेला मान्य नाही. समाजात सांप्रदायिकता रहावी हीच भाजपाची भूमिका आहे. विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक योजनांचा लाभ समाजातील सर्व घटकांना मिळवून देताना कधीही धर्माचा विचार करून भेद निर्माण होऊ दिला नाही. समाजातील प्रत्येक घटकांची उन्नती हाच योजना सुरू करण्यामागचा विचार आहे. पण केवळ आता मताच्या तुष्टीकरणासाठी फतवे काढले जात असतली तर सुज्ञ मतदार अशा राजकारणाला कधीही साथ देणार नाहीत.

# पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ राजकिशोर मोदी व सहकाऱ्यांनी संपूर्ण अंबाजोगाई शहर काढले पिंजून




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री मा ना अजितदादा पवार त्याचबरोबर राज्याचे कृषिमंत्री मा ना धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीच्या उमेदवार पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहराच्या प्रत्येक प्रभागातील कोपरा न कोपरा पिंजून काढत आहेत. आपल्या अनेक सहकाऱ्यांना त्याचबरोबर मित्रपक्षांतील देखील सहकर्यांना सोबत घेऊन शहरभर प्रचार करतांना दिसत आहेत.शहरातील अबाल वृद्ध तथा युवा पिढीकडून त्यांना उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे. या प्रचारफेरी दरम्यान राजकिशोर मोदी यांच्या सोबत माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा,बबन लोमटे, महादेव आदमाने, खालेद चाऊस,किशोर परदेशी, भाजपचे माजी नगरसेवक कमलाकर कोपले, अनंत लोमटे, शरद कोपले, राहुल कोपले,शैलेश कुलकर्णी, तसेच माजी नगरसेवक धम्मा सरवदे, दिनेश भराडीया , संतोष शिनगारे, रुपेश चव्हाण,सुनील वाघाळकर , संजय कोंबडे, आनंद कर्णावट, तानाजी देशमुख, पंडित हुलगुंडे, बाळासाहेब आदमाणे, आशिष ढेले, बाबासाहेब गुंजाळ, गोविंद गुंजाळ, राहुल मुंडे, सुधाकर कुचेकर, बाळू गुंजाळ, दत्ता लोंढे, सय्यद मन्सूर, खदीर सय्यद, अंकुश आवाडे, रमेश गायसमुद्रे, सिध्दार्थ वाघमारे, शाकेर काझी यांच्यासह अनेक कार्यकर्ते तथा सहकारी या प्रचारफेरीत सहभागी झाले होते. अंबाजोगाई शहरातील राजीव गांधी चौक पतीसरातून वडार गल्ली, रायगड नगर,टिळक नगर, नागसेन नगर, एकात्मता कॉलनी, माऊली नगर, महात्मा फुले नगर , या भागासह सिद्धार्थ नगर, हमाल गल्ली, हावळे गल्ली, गुरुवार पेठ,गांधी नगर,गवळी पुरा, मिलिंद नगर,भोई गल्ली, मोची गल्ली, शिंपी गल्ली, सदर बाजार परिसर पिंजून काढला.अंबाजोगाई शहर व येथील नागरिकांना पंकजा गोपीनाथ मुंडे यांचे आगामी काळातील व्हिजन तथा कामाची रूपरेषा लोकांसमोर ठेवत आहेत . त्यांनी बीड जिल्हा व जिल्ह्यातील तमाम नागरिकांसाठी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी कमळ या निशाणीचे बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन देखील प्रचार रॅली दरम्यान राजकिशोर मोदी त्यांचे सहकारी करतांना आढळून येत आहेत.

बीड जिल्याचे मागासलेपणाची तसेच ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी झालेली ओळख पुसून काढण्यासाठी पंकजाताई मुंडे यांनाच मतदान रुपी आशीर्वाद देण्याचा आग्रह देखील यादरम्यान करण्यात येत आहे.राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा. ना. अजित पवार, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वाखाली अंबाजोगाई शहरात प्रचारफेरी दरम्यान पंकजा ताईंना मत म्हणजेच बीड जिल्ह्याच्या विकासाला मत असणार असल्याचे स्पष्टीकरण राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या कडून करतांना दिसून येत आहे. या प्रचारफेरीस प्रत्येक भागातील महिलांचा देखील प्रतिसाद मोठ्या प्रमाणावर मिळत आहे. त्यामुळे पंकजा ताईंचाच विजय हा नक्कीच होणार असे स्पष्ट चित्र या मतदारांच्या सहभाग व प्रतिसादातून दिसून येत आहे.या रॅलीत जेष्ठ सहकारी सुभाष पाणकोळी, चंद्रकांत महामुनी, बबन पाणकोळी, सुधाकर टेकाळे,विशाल पोटभरे, विष्णू पांचाळ, भाई वजीर शेख, दत्ता हिरवे, तौसिफ शेख, जावेद गवळी, महेबूब गवळी, आकाश कऱ्हाड, रोशन लाड, महेश कदम, अस्लम शेख, कमलेश परदेशी, आतिष परदेशी, शरद काळे, अमोल मिसळ, संतोष चिमने, शेख मोईन फुलवाले, भारत जोगदंड, गौरव कसबे यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

# अक्षय तृतीयेचा मुहूर्तः ‘बालविवाह’ रोखण्यासाठी शासकीय यंत्रणा सतर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मे महिन्यात दि.१० रोजी ‘अक्षय तृतीया’ या मुहूर्तावर अनेक विवाह होत असतात. त्यात बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि,बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा, तालुका व गाव पातळीवरील शासकीय यंत्रणांना सतर्क राहण्याचे सुचित करण्यात आले आहे, तसेच नागरिकांनाही अशा विवाहाची माहिती गोपनियरित्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा कृती दलाची स्थापना करण्यात आली असून बालविवाह निर्मूलन कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. गेल्या वर्षभरात (दि.१ एप्रिल २०२३ पासून) जिल्ह्यात आतापर्यंत ७५ बालविवाह रोखण्यात कृती दलाला यश आले आहे. त्यातील तीन प्रकरणांमध्ये गुन्हा ही दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांच्या निर्देशान्वये जिल्ह्यात बालविवाह निर्मूलनाकरीता जनजागृतीसाठी कार्यक्रम घेण्यात येत आहेत. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ च्या कायद्याची जाणीव व्हावी यासाठी तसेच बाल वयात बाल हक्कांपासून वंचित राहू नये म्हणून सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे कामकाज सुरु आहे. बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ या कायद्यान्वये मुलीचे वय १८ वर्षे तर मुलाचे वय २१ वर्षाच्या आत असतांना विवाह केला तर असा विवाह बालविवाह म्हणून गणला जातो. त्यासाठी १ लाख रुपये आर्थिक दंड व २ वर्षे सक्त मजूरीची शिक्षा किंवा दोन्ही असे शिक्षेचे प्रावधान आहे.ग्रामपंचायतीसाठी ग्रामसेवक तर नागरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) हे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून शासनाने घोषित केले आहे. आपल्या परिसरात वा गावात बालविवाह होत असल्याचे निदर्शनास आल्यास आपण संबंधितांकडे माहिती देऊ शकता. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाते.जिल्ह्यात कोठेही बालविवाह होत असतील किंवा होऊ घातले असतील तर नागरिकांनी अशी माहिती चाईल्ड हेल्प लाईन १०९८ किंवा ११२ या क्रमांकावर द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल. बालविवाहाबाबतची माहिती जवळचे पोलीस स्टेशन, ग्रामपंचायत कार्यालय, पंचायत समिती, बाल कल्याण समिती, जिल्हा बालसंरक्षण कक्ष तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचे कार्यालय येथेही देता येईल. नागरिकांनी आपल्या जवळपास होणारे विवाह जर बालविवाह असतील तर त्याची माहिती द्यावी असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. एन. चिमंद्रे यांनी केले आहे.

# निवडणुकीदरम्यान ‘डीप फेक’ रोखण्यासाठी कारवाई करण्याचे शासनाचे आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीदरम्यान डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स, फोटो किंवा इतर प्रकारचा कंटेंट तयार करून तो समाजमाध्यमे / डिजिटल माध्यमांवरून प्रसारित करण्यात येत आहे. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितांवर कडक कारवाई शासनामार्फत करण्यात येणार आहे. यासंदर्भात पोलीस महासंचालकांना सूचना देण्यात आल्या आहेत. फोटोशॉप, मशीन लर्निंग (एमएल) किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) यांसारख्या विविध तंत्रांचा गैरवापर करून डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स, फोटो किंवा इतर प्रकारचा कंटेंट तयार करण्यात येतो. निवडणुकीदरम्यान या तंत्राचा गैरवापर हा चिंतेचा विषय आहे. एखादा उमेदवार, राजकीय पक्ष किंवा निवडणुकीच्या मुद्द्याविषयी चुकीचे व्हिडिओ, ऑडिओ, फोटो तयार करण्यात येतात किंवा खऱ्या फोटो, ऑडिओ,



व्हिडिओमध्ये फेरफार करून ते चुकीच्या पद्धतीने प्रसारित करण्यात येतात. असे गैरपद्धतीने तयार केलेले डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स किंवा फोटो खरे असल्यासारखे भासतात आणि त्यामुळे संबंधिताविषयी गैरसमज किंवा बदनामी होते. निवडणूक काळात अशा प्रकरणांमध्ये वाढ होत असून यावर आळा घालण्यासाठी तसेच स्वच्छ आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया होण्याच्या दृष्टीने ‘डीप फेक’ कंटेंट तयार करणाऱ्या आणि प्रसारित करणाऱ्या समाजकंटकांवर कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात यावी, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत.

राज्य शासनामार्फत पोलीस महासंचालकांना यासंदर्भात सूचना देण्यात आल्या असून पोलीस खात्यामार्फत यासंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगानेही विपर्यस्त माहिती रोखण्यासंदर्भात त्यांच्या मार्गदर्शिकेमध्ये सूचना दिल्या आहेत.

# जातीपातीच्या चक्रव्यूहात अडकू नका, देश आणि देशाबरोबर बीड जिल्हा समृद्ध करण्यासाठी पंकजाताईंना निवडून द्या-धनंजय मुंडे

## राजुरी नवगण, केतुरा सर्कलमध्ये पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ विजयी संकल्प मेळावा संपन्न





**बीड । प्रतिनिधी**

सध्या सुरु असलेली निवडणूक ही ग्रामपंचायत, जिल्हापरिषद किंवा विधानसभेची नाही तर ही निवडणूक देशाची निवडणूक आहे. त्यामुळे जातीपातीच्या चक्रव्यूहात अडकू नका. आपला देश समृद्ध करण्यासाठी आणि देशाबरोबर आपला बीड जिल्हा समृद्ध करण्यासाठी पंकताईं मुंडेंना निवडून द्या. असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी नवगण राजुरी सर्कलमधली केतुरा गावात काल पार पडलेल्या विजयी संकल्प मेळाव्यात केले.

काल दि. ४ में रोजी रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान नवगण राजुरी सर्कलमधली केतुरा गावात शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, बबन बापू गवते, सचिन मुळूक, बळीराम गवते यांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखली बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ विजयी संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यासाठी प्रमुख उपस्थिती राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी, भाजप तथा शिवसेनेचे आणि रिपाईचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यासाठी नवगण राजुरी सर्कलमधून हजारोंच्या संख्यमध्ये जेष्ठ नागरिकांसह, महिला ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बबन बापू गवते यांनी सांगितले की, सातत्याने आम्ही राजुरी सर्कलमधून धनु भाऊ तुम्हाला पाठिंबा दिला आहे. आताही राजुरी सर्कलमधून पूर्ण ताकदीने सर्व जाती धर्मातून पंकजाताईना विजयी करा असे आवाहन मी ग्रामस्थांना करतो. शिवसेना आणि राष्ट्रवादी शिवाय नवगण राजुरी सर्कल कुणालाही थारा देणार नाही असे मी आश्वास्थ करतो आणि पंकजाताई मुंडे यांना लोकसभा निवडणुकीसाठी शुभेच्छा देतो. यादरम्यान ग्रामस्थांशी अनिलदादा जगताप यांनी संवाद साधला ते म्हणाले की, राजकारण आणि आरक्षण हे दोन्ही मुद्दे वेगवेगळे आहेत. तरीही विरोधक जाणीवपूर्वक आरक्षणावरून मराठा समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत, बुध्दीभेद करु लागले आहेत. मात्र समाज बांधव पंकजाताई यांना भरगच्च मतांनी निवडून देतील यात काही शंका नाही. जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना नवगण राजुरी सर्कलमधून भरगोस मतांनी निवडून देण्यात यावे असे आवाहन करतो. अनिलदादा यांच्या आवाहनाला साद घालत उपस्थित ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजारात प्रतिसाद दिला. यानंतर विजयी संकल्प मेळाव्यात धनंजय मुंडे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, जिल्हयात सात लाख हेक्टर जमीन कोरडवाहू आहे ही सर्व जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी आपण पंकजाताई याना विजयी करा. महायुती म्हणून आम्ही सर्वजण एकदिलाने काम करत आहोत. जिल्ह्यात विकासाचे, सिंचनाचे अनेक प्रकल्प राबवत आहोत, राजकारणात मी सक्रिय झालो तेव्हा बीड जिल्ह्यात कधीच जातपात नव्हती. सर्व जातीचे लोक बीडमधून खासदार झाले, हा बीड जिल्ह्याचा सर्वधर्मसमभावाचा राजकीय इतिहास आहे. इथे जात पाहून नव्हे तर व्यक्तीचे कर्तृत्व पाहून उमेदवाराला निवडून देणारी जनता आहे. कोणी कोणाच्या जातीत जन्माला यावं हे आपल्या हातात नसत. त्यामुळे जातिवादाला महत्व देऊ नका. देश विकासासोबत जिल्ह्याचा विकास करण्यासाठी ही निवडणूक आहे. पंकजाताई मुंडे यांना खासदार म्हणून मोदींजींच्या पाठीशी उभे करा असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले. याप्रसंगी उप सभापती श्यामभाऊ पडुळे, पंचायत समिती सदस्य सचिन शेळके, बाजार समिती संचालक दीपक काळे, खरेदी विक्री संघांचे संचालक साहेबराव पोपळे, बीड विधानसभा प्रमुख सुनील भाऊ अनभुले, जिल्हा संघटक सुनील सुरवसे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष महादेव उबाळे, राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष नंदकुमार कुटे, शहराध्यक्ष बाळासाहेब गुजर, शिवसेना उपजिल्हा प्रमुख संतोष जाधव, अजय जाधव, शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे, मधुकर शिंदे, सर्जेराव तात्या शिंदे, मधुकर महाराज शिंदे, सदाशिव सुर्वे, हनुमंत प्रसाद पांडे, बंटी धनवे, आकाश वडमारे, अनिकेत नाटकर, लक्ष्मणसिंह ठाकूर, आबासाहेब जाधव, शेख हुसेन, अरुण चौरे, योगेश बहिरवाड अवलपूर सोनगावचे सरपंच चंद्रकांत सपकाळ, रुद्रापूरचे सरपंच अशोक गिते, उप सरपंच गोरख अगाव, सरपंच पंऊंगुळ सरपंच शिवमुर्ती तात्या सानप, उक्कडपिंपरी सरपंच जगनाथ पालवे, केतुरा उप सरपंच वसंत शिरसाठ, ग्रामपंचायत सदस्य हनुमान शिरसाठ, श्रीधर गायकवाड, सोमनाथ वांडरे, सुदर्शन घाडगे, हनुमान काशीद, रमेश काळे, सूर्यकांत जगताप, केशव घिगे, नवनाथ सोनसाळे, बाळासाहेब गात, खंबालिंबा गावाचे सरपंच बालाजी गिते यांच्यासह आजी माजी पदाधिकारी, सरपंच तथा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवगण राजुरी सर्कलमधील गावांच्या विकासाची गाव्ही धनंजय मुंडे यांनी यावेळी दिली. याबरोबरच श्री क्षेत्र नगद नारायण गडाच्या विकासासाठी पंचवीस कोटी राज्य सरकारने मंजूर केलेले आहेत. आणि यापुढेही नारायण गडाच्या विकासासाठी भविष्यात दोनशे पन्नास कोटींची जरी गरज लागली तरी मी आणि राज्याचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व महायुतीचे सरकार मागे हटणार नाही असे अश्वासन धनंजय मुंडे यांनी विजयी संकल्प मेळाव्यामध्ये दिले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .